ePaper
कोलकाता उच्च न्यायालयाकडून जनावरांच्या कत्तलीवरील बंदी कायम
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | शनिवार | दि. 23 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 2 वरुन...

पुणे ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई!

## 10 राज्यांमधील 24 राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

# राज्यसभेचा बिगुल!



**महाईन्यूज ।
नवी दिल्ली**

**भारतीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या 24 जागांसाठी निवडणुकीची घोषणा केली आहे. जून-जुलै महिन्यात 10 राज्यांतील राज्यसभेच्या 24 सदस्यांचा कार्यकाळ संपणार असून, त्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. याशिवाय महाराष्ट्र आणि तामिळनाडूमधील दोन राज्यसभा जागांसाठी पोटनिवडणुकीची घोषणाही करण्यात आली आहे.**

राज्यसभेच्या या जागांसाठी मतदान 18 जून रोजी होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणी करून निकालही जाहीर करण्यात येणार आहेत. सध्याच्या सदस्यांचा कार्यकाळ 21 जून ते 19 जुलै या कालावधीत वेगवेगळ्या तारखांना संपणार असल्यामुळे निवडणूक आयोगाने वेळापत्रक जाहीर केले आहे.

राज्यसभा निवडणुकीसाठी 1 जून रोजी अधिसूचना (NOTIFICATION) जारी केली जाईल. इच्छुक उमेदवारांना 8 जूनपर्यंत अर्ज (नामांकन) दाखल करता येणार आहेत. त्यानंतर छाननी प्रक्रिया पूर्ण होईल आणि 18 जूनला मतदान व निकाल जाहीर केला जाईल. या निवडणुकीकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे, कारण गुजरातपासून राजस्थानपर्यंत अनेक राज्यांमध्ये राजकीय समीकरणांवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील पोटनिवडणुकीमुळेही राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### राज्यनिहाय जागा

आंध्र प्रदेश : ४ जागा
गुजरात : ४ जागा
कर्नाटक : ४ जागा
मध्य प्रदेश : ३ जागा
राजस्थान : ३ जागा
झारखंड : २ जागा
मणीपूर : १ जागा
मेघालय : १ जागा
अरुणाचल प्रदेश : १ जागा
मिझोरम : १ जागा

### राज्यसभेचा निवडणूक कार्यक्रम

- नोटीफिकेशन - १ जून
- अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत - ८ जून
- अर्जांची छाणनी - ९ जून
- अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत - ११ जून
- मतदान - १८ जून (सकाळी ९ ते दुपारी ४)
- मतमोजणी - १८ जून (सायं. ५ नंतर)

### दोन जागांसाठी पोटनिवडणूकही होणार

महाराष्ट्रामध्ये सुनेत्रा पवार यांनी आमदार झाल्यानंतर 6 मे रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यांचा कार्यकाळ 4 जुलै 2028 पर्यंत होता. त्यामुळे त्यांच्या रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे. तर तामिळनाडूमध्ये सी. व्ही. षण्मुगम यांनी विधानसभा निवडणुकीत मैलम मतदारसंघातून आमदार झाल्यानंतर 7 मे रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यांचा कार्यकाळ 29 जून 2028 पर्यंत होता.

### राज्यसभेत निवडणुका कशा घेतल्या जातात?

राज्यसभा हे एक स्थायी सभागृह असल्यामुळे आणि दर दोन वर्षांनी एक-तृतीयांश सदस्य निवृत्त होत असल्यामुळे निवडणुका दर दोन वर्षांनी होतात. राज्यसभेच्या एकूण जागा 245 आहेत. यापैकी 233 जागा अप्रत्यक्षपणे निवडल्या जातात आणि 12 सदस्य राष्ट्रपतींद्वारे नामनिर्देशित केले जातात. राज्यसभा निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक मतांची संख्या पूर्वनिश्चित असते. मतांची संख्या एकूण आमदारांची संख्या आणि राज्यसभेच्या जागांच्या संख्येच्या आधारावर मोजली जाते. एका आमदाराच्या मताचे मूल्य 100 आहे.

# पुणे ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई!

## 2 कोटी ३९ लाखांचा गांजा; आंतराराज्यीय गांजा तस्करी करणारी टोळी गजाआड

**महाईन्यूज । पुणे**

**आंतरराज्यीय गांजा तस्करांना पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, तसेच बारामती शहर पोलिसांनी अटक केली. या कारवाईत पोलिसांनी दोन कोटी ३९ लाख रुपयांचा ६३४ किलो गांजा जप्त केला. या टोळीने पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यात गांजा विक्री केली आहे. आरोपींकडून गांजासह मोटारी, तसेच अन्य वस्तू असा तीन कोटी तीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.**



### 'वन्यप्राण्यांची खरेदी करू नका'

प्राणी-पक्ष्यांची विक्री करणाऱ्या (पेटशॉप) चालकांकडून सांगितल्या जाणाऱ्या खोट्या माहितीला बळी पडू नका. अनेकदा हे व्यावसायिक कायद्याची माहिती लपवून बंदी असलेले प्राणी किंवा पक्ष्यांची विक्री करतात. वन्यजीव (संरक्षण) कायद्याअंतर्गत भारतीय; तसेच काही परदेशी (एक्झॉटिक) वन्यजीवांची खरेदी-विक्री आणि ते घरात पाळणे हा गंभीर व अजामीनपात्र गुन्हा आहे. वन्यजीवांची बेकायदा विक्री किंवा तस्करी आढळल्यास वन विभागाच्या १९२६ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधा, असे आवाहन सहायक वनसंरक्षख विशाल चव्हाण यांनी केले.

समाधान धर्मराज गायकवाड, विकी उर्फ पप्पू कांबळे, प्रकाश उर्फ पक्या मोहन काटे, प्रिन्सकुमार मुन्ना सिंग, राहुल कल्याण गोरे,संग्राम उर्फ चंदन सिंग, जॉकी माझी, तसेच हुसेन सुखदेव लष्करे, आदित्य विकास शिंदे, युवराज ज्ञानेश्वर दुर्गे अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. 'विक्की कांबळे हा मुख्य सूत्रधार आहे. आरोपी जॉकी माझी हा मूळचा ओदिशाचा आहे. आरोपी प्रिन्स हा मूळचा बिहारचा आहे. आरोपी माझी याच्या मदतीने कांबळे आणि साथीदारांनी छत्तीसगडमधून गांजा आणला होता. पुणे जिल्हा, सोलापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात त्यांनी गांजा विक्री केली होती. बारामती परिसरात त्यांनी गांजा साठवून ठेवला होता. आरोपी लष्करे, शिंदे, दुर्गे हे कोथरूड परिसरात राहायला आहेत. आंतरराज्यीय गांजा तस्करी करणारी टोळी पश्चिम महाराष्ट्रातील छोट्या गांजा विक्रेत्यांना गांजा विक्री करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर ग्रामीण पोलिसांची गुन्हे शाखा आणि बारामती शहर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला', अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिली.

आरोपी सिंग आणि कांबळे हे दोन मोटारीतून गांजा घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. पंढरपूर-फलटण मार्गावर पोलिसांनी सापळा लावला. एक मोटार सांगलीकडे गेली. त्यानंतर याबाबतची माहिती सांगली पोलिसांच्या गुन्हे शाखेला देण्यात आली. पोलिसांनी सापळा लावून दोन मोटारींना अडविले. आरोपींना अटक केली. पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अतिरिक्त अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, बारामती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी, सहायक निरीक्षक कुलदीप संकपाळ, उपनिरीक्षक बाळासाहेब कारंडे, अभिजित एकशिंगे, ज्ञानेश्वर क्षीरसागर, स्वप्नील अहिवळे, नीलेश शिंदे, अजय घुले, रत्नदीप भंडारे, रामचंद्र शिंदे, सुलतान डांगे यांनी ही कारवाई केली. या टोळीने कोणाला गांजा विक्री केली, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे.

# पुण्यात तरुणीसह मित्रावर ॲसिड हल्ला, आरोपीला हुबळीतून अटक

**महाईन्यूज । पुणे**

**प्रेमसंबंध तोडल्याच्या रागातून एका तरुणीसह तिच्या एका मित्रावर ॲसिड फेकून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना बंडगार्डन पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. या हल्ल्यात तरुणी गंभीररीत्या भाजली आहे. दोघांवर सध्या ससून रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या प्रकरणातील आरोपीला पुणे गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने कर्नाटकातील हुबळी येथून अटक केली आहे.**



श्रीराम मधु सरुनवर (वय २०, रा. तोणवाला, आमला, मध्य प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत २१ वर्षीय तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी आणि पीडित तरुणी नातेवाइक असून, दोघेही मध्य प्रदेशातील रहिवासी आहेत. त्यांच्यात पूर्वी प्रेमसंबंध होते. मात्र, २०२५ मध्ये दोघांमध्ये वाद झाल्यानंतर तरुणीने त्याच्याशी संबंध तोडले होते. त्यानंतरही श्रीराम तिचा सतत पाठलाग करीत होता. त्रास असह्य झाल्याने तरुणीने मध्य प्रदेशात त्याच्याविरोधात तक्रारही दाखल केली होती. त्यामुळे आरोपी तिच्यावर चिडून होता. दरम्यान, भोपाळमध्ये काम करीत असताना तरुणीची ओळख आदर्श पांडे याच्याशी झाली आणि त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. ही बाब समजल्यानंतर आरोपी दोघांनाही धमक्या देत होता. काही महिन्यांपूर्वी तरुणी आणि आदर्श पुण्यात येऊन ताडीवाला रस्ता परिसरात लिव्ह-इनमध्ये राहत होते. दोघेही 'द मिलर रेस्टॉरंट बार' मध्ये काम करीत होते. आरोपी वारंवार फोन करून 'तू माझी नाही तर कोणाचीच नाही,' अशी धमकी देत असल्याचे तपासात समोर आले आहे.

घटनेच्या रात्री काम आटोपून तरुणी आणि आदर्श हे दोघे घरी जात असताना जनता विद्यालयाजवळ आरोपीने त्यांना अडवले. त्यानंतर त्याने थेट तरुणीच्या अंगावर ॲसिड फेकले. आदर्शने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्याच्यावरही ॲसिड फेकण्यात आले. या हल्ल्यात तरुणीच्या पाठीवर, हातांवर आणि पायांवर गंभीर जखमा झाल्या असून, ती जागीच कोसळली. हल्ल्यानंतर आरोपीने घटनास्थळावरून पळ काढला.

### चकवा देण्यासाठी आरोपीने बदलले कपडे

स्थानिक नागरिक आणि पोलिसांच्या मदतीने दोघांनाही तत्काळ ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर गुन्हे शाखा आणि बंडगार्डन पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज तपासताना आरोपी रेल्वे स्थानकावरून चालुक्य एक्स्प्रेसने पसार झाल्याचे उघड झाले. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी त्याने प्रवासादरम्यान तीन वेळा कपडे बदलल्याची माहितीही तपासात समोर आली. खंडणीविरोधी पथकातील पोलिस कर्मचारी सुरेंद्र जगदाळे, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले आणि तानाजी देशमुख यांच्या पथकाने आरोपीला हुबळी येथून ताब्यात घेतले. पोलिस निरीक्षक राम राजमाने आणि सुदर्शन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.



# सांडपाणी सोडणाऱ्या सोसायट्यांना दंड!

## ३८ सोसायटीची तपासणी अन् २६ सोसायट्यांवर दंडात्मक कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील किवळे, मामुर्डी, रावेत, वाकड, पुनावळे आणि ताथवडे या भागात गृहनिर्माण सोसायट्यांकडून एसटीपी सुरु असताना देखील त्याला बायपास करुन सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते थेट महापालिकेच्या ड्रेनेजमध्ये सोडले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या (पीसीएमसी) पर्यावरण विभागाने या गंभीर बाबीची दखल घेत धडक तपासणी मोहीम हाती घेतली आहे.**



### २६ सोसायट्यांना दणका

महापालिकेच्या पथकाने रावेत, किवळे, मामुर्डी, पुनावळे, ताथवडे आणि वाकड या परिसरातील सोसायट्यांची प्राधान्याने तपासणी केली. यामध्ये नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६ सोसायट्यांवर थेट कारवाईचा बडगा उगारण्यात आला. पर्यावरण नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी या सोसायट्यांना १० हजार रुपयांपासून ते २५ हजार रुपयांपर्यंतचा दंड ठोठावण्यात आला आहे. केवळ दंड करून महापालिका थांबली नाही, तर अत्यंत निष्काळजीपणा करणाऱ्या काही सोसायट्यांचे पाण्याचे नळ कनेक्शन तात्पुरत्या स्वरूपात खंडित करण्यात आले आहे. महापालिकेच्या या आक्रमक पवित्र्यामुळे सोसायटी पदाधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

शहरातील विविध भागांतील ३८ सोसायटीची तपासणी करुन २६ सोसायट्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. काही सोसायट्यांचे नळ कनेक्शन देखील महापालिकेने खंडित केले आहे. या कारवाईमुळे सांडपाणी व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांचे धाबे दणाणले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. शहराच्या चारही बाजूने नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखाचा आसपास पोहोचली आहे. त्यामुळे शहरवासीयांना ६२० ते ६३० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी दिवसाला दिले जाते. मात्र, इतके पाणी देवून शहरातील नागरिकाकडून पाण्याची मागणी वाढत आहे.

वाढत्या लोकसंख्येला हे पाणी पुरत नाही. मागील सहा वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. लोकसंख्या वाढली, मात्र पाण्याची उपलब्धतता वाढली नाही. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची समस्या गंभीर होते. एकत्रित बांधकाम व विकास नियमावलीनुसार (युडीसीपीआर) २० हजार चौरस मीटर पुढील क्षेत्रफळावरील, शंभर सदनिका आणि दररोज २० हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना पाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शहरातील मोठ्या हौऊसिंग सोसायट्यांना सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. ज्या सोसायट्यांना मैलाशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित ठेवून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे, अशा सोसायट्यांना मैला शुद्धीकरण केंद्र कार्यान्वित ठेवण्याबाबत वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार बहूतांश सोसायट्यांनी मैला शुद्धीकरण केंद्र कार्यान्वित केले. काही सोसायट्यांनी मैलाशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित ठेवून पाण्याचा पुनर्वापर न केल्याने पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होत होता.

महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून खाजगी सोसायटीतील मैलाशुध्दीकरण केंद्राची तपासणी करण्यात येत आहेत. शहरात एकूण शंभर सदनिका पेक्षा मोठ्या असणा-या ४९४ सोसायटी आहेत. त्यातील ३६३ सोसायटीत मैलाशुद्धीकरण सुरु आहे.

महापालिकेने १३१ सोसायट्यांना टप्प्याने नोटीस बजावून कारवाई केली जात आहे. यामध्ये ३८ सोसायटीची तपासणी करत २६ सोसायटीवर दंडात्मक व नळ कनेक्शन बंदची कारवाई करण्यात आली. काही सोसायट्यांना नोटीस देवून मैलाशुध्दीकरण कार्यान्वित करण्यास सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. अशा त्या सोसायटीचे नळ कनेक्शन बंद करण्यात येत आहेत. मैलाशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित ठेवून पाण्याचा पुनर्वापर न करणा-या सोसायटीवर कारवाई यापुढे सुरुच राहणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असून मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांची संख्या वाढली आहे. नियमांनुसार, मोठ्या सोसायट्यांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मलनिःसारण प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक सोसायट्यांमध्ये एसटीपी प्रकल्प केवळ नावापुरतेच कार्यरत असल्याचे किंवा वीज बिल आणि देखभालीचा खर्च वाचवण्यासाठी ते बंद ठेवले जात असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले होते.

या पार्श्वभूमीवर, महापालिकेच्या पर्यावरण विभागाने शहरातील विविध भागांतील सोसायट्यांमध्ये अचानक तपासणी मोहीम सुरू केली. या तपासणी दरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. काही सोसायट्यांमध्ये एसटीपी यंत्रणा चालू स्थितीत असतानाही, सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते पाणी थेट बाहेरील नाल्यांमध्ये किंवा मोकळ्या जागेत सोडले जात असल्याचे पथकाला आढळून आले.

# वादळी पावसाचा तडाखा : भोसरी, मोशीसह अनेक ठिकाणी झाडे कोसळली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात आज दुपारी अवकाळी पावसाने अचानक जोरदार हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून तीव्र उष्णतेमुळे आणि उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.**




शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले आणि सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. तब्बल अर्धा ते पाऊण तास पडलेल्या या मुसळधार पावसामुळे शहरातील रस्त्यावर पाणी साचले होते. या पावसामुळे वातावरणातील उष्णता कमी होऊन हवेत छान गारवा निर्माण झाला आहे.

पावसासोबत आलेल्या तीव्र वादळी वाऱ्यामुळे शहरात काही ठिकाणी किरकोळ दुर्घटना घडल्या. निगडी परिसरात एका मुख्य रस्त्यावरील उच्च दाबाची विद्युत प्रवाहाची केबल अचानक तुटून खाली पडली. सुदैवाने, केबल पडली तेव्हा तिथे कोणीही नसल्याने मोठा अनर्थ टळला. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेऊन पुरवठा खंडित केला आणि दुरुस्तीचे काम सुरू केले.

दुसऱ्या एका घटनेत, भोसरी परिसरात एका मोठ्या झाडावर वीज कोसळल्याची घटना घडली. वीज कोसळल्याने झाडाचे मोठे नुकसान झाले, मात्र सुदैवाने यातही कोणतीही जीवितहानी झाली नाही.

शहरात वादळामुळे दोन ते तीन ठिकाणी मोठी झाडे उन्मळून पडली, तर अनेक भागांत झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर आल्या. यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या जवानांनी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने तत्परता दाखवत रस्त्यावरील झाडे आणि फांद्या हटवून वाहतूक पूर्ववत केली.

अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे चाकरमानी, वाहनचालक आणि उघड्यावरील व्यापाऱ्यांची काही प्रमाणात तारांबळ उडाली, तरीही उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांनी चांगलाच पावसाचे गारवा निर्माण केला आहे.



## भूमिका

**इराण-इस्रायल संघर्षामुळे जागतिक बाजारपेठा अस्थिर झाल्या, तेलाच्या किमती वाढल्या आणि अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर दबाव निर्माण झाला. भारतही त्याला अपवाद नाही. मात्र सध्याच्या आर्थिक अडचणींचे संपूर्ण खापर युद्धावर फोडणे हे वास्तवापासून दूर जाणारे ठरेल.**

# युद्ध, रुपया आणि आर्थिक वास्तव



कारण रुपयाची घसरण, परकीय गुंतवणुकीतील घट आणि आर्थिक मंदीची चिन्हे ही युद्धाआधीपासूनच स्पष्ट दिसत होती. युद्धाने केवळ आधीच कमकुवत झालेल्या अर्थव्यवस्थेला अधिक धक्का दिला आहे.

गेल्या दशकभरात 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांचा मोठा प्रचार झाला. या योजनांमुळे भारत उत्पादन आणि निर्यात क्षेत्रात जागतिक स्तरावर मजबूत बनेल, अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात निर्यातीत अपेक्षित वाढ झाली नाही. उलट परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून मोठ्या प्रमाणावर पैसा काढून घेण्यास सुरुवात केली. आर्थिक वर्ष संपताना लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक बाहेर गेली, तर नव्या गुंतवणुकीचा वेग कमी झाला. याचा थेट परिणाम रुपयावर झाला. डॉलरची मागणी वाढली आणि रुपया सतत घसरत गेला.

रिझर्व्ह बँकेने रुपयाला आधार देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर डॉलर विकले. परकीय चलनसाठ्यात घट झाली; पण तरीही रुपया स्थिर राहू शकला नाही. हे चित्र केवळ बाह्य संकटाचे नसून अंतर्गत आर्थिक कमकुवतपणाचे द्योतक आहे. अर्थव्यवस्थेची पायाभूत ताकद मजबूत असती, तर आंतरराष्ट्रीय धक्क्यांचा परिणाम इतका तीव्र झाला नसता.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी "सोने खरेदी टाळा", "इंधन वाचवा" अशी आवाहने केली. कारण भारताला खनिज तेल आणि सोने मोठ्या प्रमाणावर आयात करावे लागते. या दोन्हींसाठी डॉलर खर्च होतो आणि रुपया कमकुवत झाल्यावर आयात आणखी महाग होते. मात्र प्रश्न असा आहे की नागरिकांनी सोने खरेदी का वाढवली? त्यामागे केवळ परंपरा नाही, तर आर्थिक असुरक्षिततेची भावना आहे. जेव्हा लोकांना चलनाचे भविष्य अनिश्चित वाटते, तेव्हा ते सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहतात. सरकार स्वतः सोन्याचा साठा वाढवत असताना नागरिकांना मात्र त्यापासून दूर राहण्याचा सल्ला देणे विसंगत वाटते.

खरा मुद्दा म्हणजे अर्थव्यवस्थेतील मूलभूत समस्या. उत्पादनक्षमता वाढवणे, निर्यात मजबूत करणे, रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि गुंतवणूकदारांचा विश्वास टिकवणे या क्षेत्रांत अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. त्यामुळे प्रत्येक जागतिक संकट भारतातील आर्थिक कमतरता अधिक स्पष्टपणे उघड करते. युद्ध नसते तरी अमेरिकेबरोबरचा व्यापार करार, वाढती आयात आणि घटती गुंतवणूक यांमुळे अर्थव्यवस्थेवर दबाव आला असताच.

सरकारने आता घोषणांपेक्षा वास्तव स्वीकारण्याची गरज आहे. नागरिकांच्या सवयींना दोष देण्याऐवजी अर्थव्यवस्थेची पायाभूत रचना मजबूत करण्यावर भर द्यायला हवा. अन्यथा प्रत्येक आंतरराष्ट्रीय संकट हे भारतातील आर्थिक दुर्बलतेचे आरसे ठरत राहील. युद्धाने सरकारला तात्पुरती सबब दिली असली, तरी अर्थव्यवस्थेची खरी कसोटी अजून बाकी आहे.

## प्रासंगिक »

### श्रेष्ठ कोण ?

**एक माणूस अरण्यात फिरत असता तेथे त्याची एका सिंहाशी भेट झाली. त्यावेळी त्या दोघांनी निरनिराळ्या विषयांवर बऱ्याच गप्पा मारल्या व त्यामुळे ते दोघे एकमेकांस आवडू लागले.**

शेवटी मात्र ते 'माणूस श्रेष्ठ की, सिंह श्रेष्ठ?' या विषयावर बोलू लागले व त्याचे वादात रूपांतर झाले. ते दोघेही भांडू लागले. नुसत्या बोलण्याने माणसाचे श्रेष्ठत्व त्या माणसास सिध्द करता येईना, तेव्हा त्याने आपल्याजवळ असलेले चित्र त्याला दाखविले. सिंहाची आयाळ हातात धरून त्याच्या पाठीवर एक माणूस आहे असे ते चित्र होते. ते पाहून सिंह त्याला म्हणाला, 'ज्याने हे शिल्प तयार केले तो मनुष्य होता, तोच जर सिंह असता तर माणसाच्या छातीवर बसून सिंह त्याला मारतो आहे, असे त्याने दाखविले असते.'

तात्पर्य - प्रत्येक जण वाद घालताना स्वत:ला अनुकूल असतील अशीच प्रमाणे पुढे मांडतो. दुसऱ्या बाजूची प्रमाणे समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही.

मान्सून तोंडावर आला असताना कर्नाटकातील शेतकरी रासायनिक खतांच्या तीव्र टंचाईमुळे मोठ्या संकटात सापडला आहे. शेतीच्या हंगामाच्या सुरुवातीलाच खतांचा पुरवठा अपुरा पडत असल्याने बळीराजाचा जीव अक्षरशः टांगणीला लागला आहे.

# खतांअभावी बळीराजाचा जीव टांगणीला...

हवामान खात्याने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने शेतकरी आधीच चिंतेत होता. त्यात आता खतांचा तुटवडा आणि वाढते दर यामुळे संकट अधिक गडद झाले आहे. कर्नाटकात सध्या सुमारे 8 लाख 50 हजार टन रासायनिक खतांची गरज आहे. मात्र आतापर्यंत केवळ 4 लाख 31 हजार टन खतांचा पुरवठा झाला आहे. म्हणजे मागणीच्या जवळपास निम्मे खतही उपलब्ध झालेले नाही. राज्याचे कृषिमंत्री एन. चेलुवरायस्वामी यांनी स्वतःच शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करता येत नसल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजनशून्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

खतांचा प्रश्न अचानक निर्माण झालेला नाही. मध्यपूर्वेतील युद्धामुळे इंधनदर वाढले, वाहतूक खर्च वाढला आणि बाजारपेठेतील अस्थिरता तीव्र झाली. त्याचा थेट परिणाम खतांच्या उपलब्धतेवर आणि किमतींवर झाला. पण अशा परिस्थितीची पूर्वकल्पना असतानाही सरकारने वेळेत साठा उभारला नाही, ही गंभीर बाब आहे.



मान्सूनपूर्व तयारीत खतपुरवठ्याला सर्वोच्च प्राधान्य मिळणे अपेक्षित होते. कारण पेरणीच्या सुरुवातीच्या काळात खतांचा पुरवठा खंडित झाला तर त्याचा परिणाम संपूर्ण हंगामावर होतो.

रासायनिक खतांच्या वाढत्या वापराबाबत कृषितज्ज्ञ अनेकदा इशारा देत आले आहेत. जमिनीची सुपीकता घटणे, आरोग्यावर परिणाम होणे आणि उत्पादन खर्च वाढणे या समस्या त्यातून निर्माण होत आहेत. त्यामुळे सेंद्रिय शेती, पर्यायी खतांचा वापर आणि स्थानिक उत्पादन यावर अधिक भर देण्याची वेळ आली आहे. मात्र दीर्घकालीन उपायांचा विचार होईपर्यंत सध्याच्या हंगामासाठी शेतकऱ्यांना पुरेसे खत उपलब्ध करून देणे हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे.

दरम्यान, राज्यात राजकीय घडामोडींनाही वेग आला आहे. सरकारच्या तीन वर्षांच्या कार्यकाळानिमित्त मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विकासाच्या मुद्द्यावर भाजपवर टीका केली. कर्नाटक विकासात गुजरातपेक्षाही पुढे असल्याचा दावा त्यांनी केला. दुसरीकडे मंत्रिमंडळ विस्तार आणि नेतृत्वबदलाच्या चर्चांमुळे काँग्रेसमध्येही अस्वस्थता आहे. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचे समर्थक सक्रिय झाले असून हायकमांडचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

परिवहन कर्मचाऱ्यांच्या संपावर उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केल्याने आणखी एक प्रशासकीय संकट टळले. मात्र या सर्व राजकीय आणि प्रशासकीय घडामोडींमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होऊ नये, हीच खरी अपेक्षा आहे. कारण शेती वाचली तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल; अन्यथा खतटंचाईचा फटका संपूर्ण राज्याला बसल्याशिवाय राहणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



गोपाळ म्हणती कान्होबा या रे कांहीं मागों ।
आपुलाले आम्ही जीवीची तया आवडी सांगों ।

एक म्हणती उगे रे उगे मागेंचि लागों ।
निजों नका कोणी घरीं रे आजि अवघेचि जागों ॥१॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# घरी बोलावून मंत्री केलं, ही माझी चूक!

## शिंदेसेनेत पक्षप्रवेशावरुन उद्धव ठाकरेंनी बच्चू कडूंवर जोरदार टीका

महाईन्यूज । मुंबई

**शिवसेना नेते उद्धव ठाकरेंनी बच्चू कडू यांच्यावर शिंदेसेनेत प्रवेश केल्याप्रकरणी जोरदार टीका केली आहे. “आपल्यातून जो गेला तो देखील जुना शिवसैनिकच होता. घरी बोलावून मंत्री केलं ही माझी चूक होती”, अशी टीका उद्धव ठाकरेंनी कडू यांच्यावर केली. बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी प्रहार जनशक्ती राजकीय पक्ष शिंदेंच्या शिवसेनेत विलीन करुन धुनष्यबाण हाती घेतला. या पक्षप्रवेशावरुन उद्धव ठाकरेंनी बच्चू कडूंवर निशाणा साधला आहे.**





“आपल्यातून जो गेला तो जुना शिवसैनिकच होता. घरी बोलवून मंत्री केला ही माझी चूक झाली. लोभापायी जे गेले त्यांना जाऊ द्या, लढणारे कार्यकर्ते माझ्याबरोबर आहेत, याचा मला आनंद आहे”, असे उद्धव ठाकरे म्हणाले. यापूर्वी सामनाच्या अग्रलेखातून कडू यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली होती. “अमरावती विभागात बराच काळ आमदार व मंत्री असलेले श्रीमान बच्चू कडू यांनी स्वतःला मिंधे गटात विलीन करून जिवंत समाधी घेतली,” असे टीकास्त्र अग्रलेखातून कडू यांच्यावर सोडण्यात आले.

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे मुखपत्र असलेल्या सामनाच्या अग्रलेखातून कडू यांना लक्ष्य करण्यात आले होते. “कोविड काळानंतर सत्ताबदलाची चाहूल लागताच अपंग, शेतमजुरांच्या कल्याणासाठी त्यांनी मिंध्यांची भलामण सुरू केली. ही भलामण करूनही मंत्रीपद मिळाले नाही तेव्हा पुन्हा सरकारवर टीका सुरू केली. उपोषणे, आंदोलने सुरू केली. कडू महाराज २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत हरले. त्यांची आमदारकीची वस्त्रे जनतेने उतरवली तेव्हापासून त्यांची तडफड सुरू होती. आता या तडफडणाऱ्या आत्म्याने शरीरावर नवीन वस्त्रे परिधान करून मिंधे पक्षात प्रवेश केला व पुन्हा ‘आमदार’ म्हणून प्राणज्योतीचा दिवा पेटवला”, अशी टीका अग्रलेखातून करण्यात आली होती.

### अजेंडा बदलणार नाही – बच्चू कडू

दरम्यान, “झेंडा हातात घेतला असला तरी अजेंडा बदलणार नाही”, असे कडू यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर भूमिका स्पष्ट केली होती. न्यूज-१८ या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत कडू म्हणाले होते की, हिंदू असल्याचा गर्व नक्की आहे पण, वाद होता कामा नये. माझ्या मुद्द्यांवर कायम राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, लोकभावना तशी असती तर मला असा निर्णय घेण्याची गरजच पडली नसती, असेही कडू म्हणाले होते.

## ‘कॉक्रोच जनता पार्टी’चे संस्थापक अभिजीत दीपके यांना जीवे मारण्याची धमकी!

महाईन्यूज । मुंबई

**‘कॉक्रोच जनता पार्टी’ (COCKROACH JANTA PARTY) या अनोख्या आणि देशातील सर्वात मोठ्या डिजिटल राजकीय चळवळीचे संस्थापक अभिजीत दिपके (ABHIJEET DIPKE) यांना थेट जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वतः अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर “RECEIVING DEATH THREATS NOW” (आता मला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत) असे लिहीत या संदर्भातील माहिती शेअर केली आहे.**




अभिजीत दिपके यांनी त्यांच्या पोस्टमध्ये “Receiving death threats now” (आता मला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत) असे लिहित त्यांना आलेल्या धमकीचा स्क्रीनशॉट किंवा माहिती शेअर केली आहे. गेल्या काही दिवसांत त्यांनी मांडलेल्या काही भूमिका किंवा पोस्टमुळे त्यांना लक्ष्य केले जात असल्याचे प्राथमिक दृष्ट्या समोर येत आहे.

या घटनेनंतर सोशल मीडियावरील त्यांच्या पाठीराख्यांनी आणि नेटिझन्सनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. वैचारिक मतभेदांमधून थेट जीवे मारण्याची धमकी देणे अत्यंत चिंताजनक असल्याचे युझर्सचे म्हणणे आहे. अनेक पत्रकारांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची दखल घेण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित धमकी देणाऱ्या व्यक्तीविरोधात तातडीने सायबर पोलिसांत गुन्हा दाखल करावा आणि अभिजीत दिपके यांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, अशी मागणी नेटकऱ्यांकडून होत आहे. पोलीस या प्रकरणावर काय पाऊल उचलतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ‘कॉक्रोच जनता पार्टी’ आहे तरी काय?

विशेष म्हणजे, ही चळवळ सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत तब्बल २० लाखांहून अधिक लोकांनी यात सहभाग नोंदवला आहे. “काही बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे व्यवस्थेवर हल्ला करतात”, असे खळबळजनक वक्तव्य सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी एका सुनावणीदरम्यान केले होते. सरन्यायाधीशांच्या या वक्तव्यानंतर देशभरातून तीव्र पडसाद उमटले आणि याच वादातून ‘कॉक्रोच जनता पार्टी’ (COCKROACH JANTA PARTY) या डिजिटल व व्यंगात्मक राजकीय चळवळीचा जन्म झाला. विशेष म्हणजे, ही चळवळ सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत तब्बल २० लाखांहून अधिक लोकांनी यात सहभाग नोंदवला आहे. सध्या सोशल मीडियावर हा देशातील सर्वात मोठा व्हायरल ट्रेंड ठरत आहे. ही अनोखी डिजिटल चळवळ अभिजीत दीपके (३०) या मराठी तरुणाने सुरू केली आहे. दरम्यान, या चळवळीची व्याप्ती सोशल मीडियावर वेगाने वाढत असून, काही प्रमुख राजकीय नेत्यांनीही या मोहिमेला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे.

# गायीचा बळी देणे हा ईदचा भाग नाही

## कोलकाता उच्च न्यायालयाकडून जनावरांच्या कत्तलीवरील बंदी कायम

**महाईन्यूज । कोलकाता**

**आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर, बैल, वळू, गायी, वासरे आणि म्हशींच्या कत्तलीवर निर्बंध घालणाऱ्या पश्चिम बंगाल सरकारने नुकत्याच जारी केलेल्या अधिसूचनेत हस्तक्षेप करण्यास कोलकाता उच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. १३ मे रोजी जारी करण्यात आलेली सरकारी अधिसूचना न्यायालयाने २०१८ मध्ये दिलेल्या निर्देशांचीच अंमलबजावणी आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.**



'बार अँड बेंच'च्या वृत्तानुसार, "बंगाल सरकारने प्राण्यांच्या कत्तलीबाबत १३ मे रोजी जारी केलेली अधिसूचना उच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशांचे पालन करूनच जारी करण्यात आली आहे", असे मुख्य न्यायमूर्ती सुजॉय पॉल आणि न्यायमूर्ती पार्थ सारथी सेन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. न्यायालयाने अधिसूचनेच्या संदर्भातील याचिका फेटाळून लावताना, "२०१८ मधील रिट याचिका क्रमांक ३२८ मध्ये समन्वय खंडपीठाने दिलेला आदेश अंतिम आहे. याबाबत वाद नाही. ही बाब लक्षात घेता, १३ मे २०२६ रोजीच्या जाहीर अधिसूचनेला स्थगिती देण्याचे किंवा ती रद्द करण्याचे कोणतेही ठोस कारण आम्हाला दिसत नाही," असे स्पष्ट केले.



पश्चिम बंगाल प्राणी कत्तल नियंत्रण कायदा अंतर्गत आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मार्गदर्शक सूचना स्पष्ट करणारी अधिसूचना जारी केली होती, याला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उच्च न्यायालयात सुनावणी सुरु होती. "अनफिट प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय बैल, वळू, गायी, वासरे आणि म्हशींची कत्तल करता येणार नाही", असे राज्य सरकारने १३ मे रोजी जारी केलेल्या जाहीर नोटीसमध्ये म्हटले होते. तसेच, "अनफिट प्राण्यांचीच कत्तल करता येईल पण ती देखील अधिकृत कत्तलखान्यांमध्येच केली जावी", असेही या अधिसूचनेत स्पष्ट केले आहे. न्यायालयाने बंगाल सरकारच्या या अधिसूचनेला स्थगिती देण्यास नकार दिला.

### याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद

तृणमूल काँग्रेसचे आमदार अखरुझ्झामन यांनी याचिकेतून असा युक्तिवाद केला होता की, "राज्य सरकारने १३ मे च्या अधिसूचनेत 'पश्चिम बंगाल प्राणी कत्तल नियंत्रण कायद्या'च्या कलम १२ अंतर्गत कोणतीही सूट दिलेली नाही. त्यामुळे आगामी बकरी ईद दरम्यान प्राण्यांच्या बळीची धार्मिक प्रथा कायदेशीररित्या पार पाडणे अशक्य होईल. बहुसंख्य मुस्लिमांसाठी म्हैस, बैल किंवा वळू यांसारख्या मोठ्या प्राण्यांचा बळी देणे हाच धार्मिक कर्तव्य पार पाडण्याचा एकमेव आर्थिकदृष्ट्या परवडणारा मार्ग आहे", असा युक्तिवाद अखरुझ्झामन यांनी केला. दरम्यान, कोर्टाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला यावेळी दिला. "सर्वोच्च न्यायालयाने पूर्वीच स्पष्ट केले आहे की गायीचा बळी देणे हा ईद-उल-अजहाचा अनिवार्य भाग किंवा इस्लाममधील बंधनकारक धार्मिक प्रथा नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

---

# अमेरिका-इराण युद्धाला अखेर पूर्णविराम मिळणार? शांतता कराराचा अंतिम मसुदा तयार

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराशी निगडीत संपूर्ण जगाला दिलासा देणारी अपडेट समोर आली आहे. "अमेरिका-इराण यांच्यातील शांतता कराराचा अंतिम मसुदा तयार झाला असून, लवकरच याची घोषणा केली जाऊ शकते", असे वृत्त अल अरेबिया या वृत्तसंस्थेने दिले आहे. पाकिस्तानच्या मध्यस्थीने हा मसुदा तयार करण्यात आल्याचे अल अरेबियाच्या वृत्तात म्हटले आहे.**



अल अरेबियाने सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, दोन्ही देशातील करारात शस्त्रसंधीचा उल्लेख करण्यात आला आहे. तात्काळ प्रभावाने जमिनीवरील, समुद्रमार्गे आणि हवाईमार्गे युद्धविराम लागू करण्याचा आग्रह धरण्यात आला आहे. याशिवाय दोन्ही देशांकडून लष्करी तळ, नागरी वस्ती, पायाभूत आर्थिक सुविधा यावर हल्ले केले जाणार नाहीत याचाही करारात समावेश करण्यात आला आहे. प्रस्तावित मसुद्यात सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्यावर भर देण्यात आला आहे. दरम्यान, या मसुद्यात इराण अण्वस्त्र कार्यक्रमाचा उल्लेख आहे की नाही? याबाबत माहिती समोर आलेली नाही.

या करारामुळे अरबी आखात, होर्मुझची सामुद्रधुनी आणि ओमानच्या आखातात सागरी वाहतुकीच्या स्वातंत्र्याची हमी मिळण्याचीही अपेक्षा आहे. या मसुद्यात कराराच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी आणि दोन्ही देशांमधील वाद सोडवण्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन करण्याचे प्रस्तावात म्हटले आहे. करार अंमलात आल्याच्या सात दिवसांच्या आत प्रलंबित मुद्द्यांवर वाटाघाटी सुरू होतील, असे करारात म्हटल्याचे अल अरबियाने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

### तर अमेरिका निर्बंध हटवणार

प्रस्तावित करारामध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन इराणने केल्यास अमेरिकेने लादलेले निर्बंध टप्प्याटप्प्याने उठवण्याची तरतूद करण्यात आली आहे. कराराचा मसुदा तयार करताना आंतरराष्ट्रीय कायदा आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेचा विचार करण्यात आला आहे. अमेरिका आणि इराणकडून अधिकृत घोषणा झाल्यानंतर लगेचच कराराची अंमलबजावणी होणार असल्याचे अल अरेबियाच्या वृत्तात म्हटले आहे. पाकिस्तानी मंत्री मोहसीन नख्वी सध्या इराणमध्ये असून, त्यांनी या कराराबाबत इराणी नेत्यांशी चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे.

### पाकिस्तानची भूमिका

नख्वी यांनी गुरुवारी इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांची भेट घेतली. नख्वी यांनी कराराच्या पार्श्वभूमीवर इराणमधील मुक्काम वाढवला असल्याची माहिती देखील समोर आली आहे. करारावर एकमत झाल्यानंतर अंतिम घोषणा होण्यापूर्वी पाकचे लष्करप्रमुख असीम मुनीर इराणला जाण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी देखील इराणबरोबर कराराच्या दिशेने प्रगती झाल्याची माहिती स्वीडनमध्ये नाटोच्या पत्रकार परिषदेत दिली आहे. त्यामुळे आता अमेरिका आणि इराण यांच्यात अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला करार होणार की पुन्हा संघर्ष चिघळणार याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

# साध्या लूकने जिंकली चाहत्यांची मनं!



बॉलिवूड अभिनेत्री तृप्ती डिमरी (Tripti Dimri ) तिच्या आगामी 'मा बहन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हा डार्क कॉमेडी चित्रपट ४ जून २०२६ या दिवशी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे.अभिनेत्री सध्या या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, तृप्ती डिमरीने फोटोशूट केले असून तिने काही फोटो इंस्टाग्रामवर केले आहेत. तिचा लूक साधा असून, चाहत्यांची मने तिने जिंकली आहेत.पिवळ्या-हिरव्या रंगाचा सूट तिने परिधान केलेला दिसत आहे. सोशल मीडियावर तृप्तीचे हे नवे फोटोशूट ट्रेंड होत आहेत. अभिनेत्रीने पिवळ्या रंगाच्या बेसवर हिरव्या रंगाचा फ्लोरल प्रिंट सूट परिधान केला आहे, जो एक ताजेपणा आणि उन्हाळ्याची अनुभूती देतो. यासोबत तिने मॅचिंग बॉटम्स आणि हिरव्या रंगाचा दुपट्टा परिधान केला आहे, ज्यावरील नाजूक नक्षी आणि बॉर्डर डिझाइनमुळे तो अधिकच मोहक दिसतो. हा लूक पूर्ण करण्यासाठी तृप्तीने सुंदर नक्षीकाम असलेले मोठे इअररिंग्स घातले आहेत. जे तिच्या आउटफिटला अगदी जुळणारे आहेत. ज्यामुळे तिच्या लूकला एक नैसर्गिक लुक मिळाला आहे.

# विमानातील क्यूट क्षण व्हायरल!



बॉलिवूड अभिनेत्री कियारा आडवाणी (Kiara Advani) सध्या पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. यावेळी कारण ठरलं तिच्या लेकीचं एक अतिशय गोंडस छायाचित्र. कियाराने नुकतीच तिची मुलगी सरायाह मल्होत्राची एक खास झलक चाहत्यांसोबत शेअर केली आहे. विमानप्रवासादरम्यानचा हा क्यूट क्षण सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून त्यावर प्रेमाचा वर्षाव केला जात आहे. कियाराने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर ही खास पोस्ट शेअर केली. या छायाचित्रात विमानाच्या खिडकीजवळ एक रंगीत खेळणं लावलेलं दिसत आहे. खिडकीबाहेर सुंदर आकाश आणि ढगांचं मनमोहक दृश्य पाहायला मिळतं.

# कंगनानी गुपचूप केलं लग्न?



अभिनेत्री-राजकारणी कंगना रणौत यांचे काही व्हिडिओ आणि फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. व्हिडिओ ऑनलाईन समोर आल्यानंतर, त्यांनी पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सध्या त्या त्यांच्या विधानामुळे नाही तर लूकमुळे चर्चेत आल्या आहेत. या व्हिडिओमध्ये कंगना मंगळसूत्र आणि हिरव्या बांगड्या घातलेल्या दिसतात. ज्यामुळे त्यांनी गुपचूप लग्न केले आहे का, अशी विचारणा नेटकऱ्यांमधून होतेय. व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये कंगना पिच कलर सूट घातलेला दिसतेय. तिच्या गळ्यामध्ये काळ्या मण्यांचे लांब मंगळसूत्र आहे आणि हातात हिरव्या बांगड्या. एका व्हिडिओमध्ये ती आपल्या सुरक्षा रक्षकांच्या गराड्यात एका घरातून बाहेर पडताना दिसते. तिने पापराझींना कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही अथवा संवाद साधला. पण दुसरीकडे मात्र, तिने परिधान केलेले पारंपरिक दागिने आणि लूक यावरून तर्कवितर्क सुरु झाले. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया देणे सुरु केले. एका नेटकऱ्याने लिहिले, "मंगळसूत्र?? तिने लग्न केले का?" तर दुसऱ्या एकाने प्रतिक्रिया दिली, "कदाचित ती एखाद्या चित्रपटाचे शूटिंग करत असावी." आणखी एकाने म्हटले, "कंगनाला नक्कीच कल्पना होती की कॅमेरा हे दृश्य टिपणार आहे. तो नशीबवान माणूस कोणीही असो, तिच्यासाठी हे खूप छान आहे. तिचे वैवाहिक आयुष्य सुखी होवो, हीच सदिच्छा." कंगनाच्या गुपचुप लग्नाबद्दल चर्चा सुरु असताना एक वृत्त समोर आले की, कंगना खरंतर तिचा आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये बिझी आहे. असं म्हटलं जात आहे की, हा व्हिडिओ 'तनू वेड्स मनू ३' वा 'क्वीन २' च्या चित्रपटाच्या सेटवरील आहे. दरम्यान, कंगना यांना स्वत:ला स्पष्टीकरण द्यावं लागलं. त्या थोड्या नाराज देखील आहेत.

# सारा 'त्या' फोटोवरून जाम भडकली



सचिन तेंडुलकरची मुलगी आणि मॉडेल सारा तेंडुलकर ही सोशल मीडियावर चांगलीच ॲक्टिव्ह असते. सारा सहसा तिची आई अंजली तेंडुलकर यांच्यासोबत सार्वजनिक ठिकाणी नेहमी दिसते. त्यावेळी या दोघी माया लेकी पापाराझींच्या गराड्यातच असतात. साराच्या पोस्ट आणि फोटोंवर सोशल मीडियावर चांगल्या लाईक्स आणि कमेंट्स येत असतात. मात्र साराबद्दल काही लोकं ट्रोलिंग देखील करत असतात. नुकताच साराच्या बाबतीत असाच एक प्रकार झाला. एका ताहीर नावाच्या कथित पत्रकाराने साराचे बॉडी शेमिंग करण्याचा प्रयत्न केला. साराने या अशा घटनेकडे दुर्लक्ष न करत त्या संबंधित कथित पत्रकाराला चांगलेच झापले. याबाबतची पोस्ट साराने आपल्या सोशल मीडिया स्टोरीवर ठेवली आहे. सारा आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर स्वतःचा आणि आई अंजली तेंडुलकर यांचा विमानतळावर चेक इन करतानाचा फोटो शेअर केला. या फोटोला कथित पत्रकार ताहीर जासूसने आक्षेपार्ह कमेंट केली होती. सारा त्या ताहीरला उद्देशून आपल्या पोस्टमध्ये म्हणते, 'ताहीर हे खूप किळसवाणं आहे. ही काही पत्रकारिता नाही. आम्हाला एकटे सोडा. तू तुझी पोस्ट डिलीट करू शकतोस मात्र तरीसुद्धा तू किळसवाणाच आहेस.' साराच्या या पोस्टनंतर ट्रोलिंग आणि आक्षेपार्ह कमेंट करणाऱ्यांकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा त्यांचा खरा चेहरा सर्वांसमोर आणण्यास आता सेलिब्रेटी प्राधान्य देत आहेत असं दिसत आहे. अनेक महिला सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर अशाच प्रकारे जे कोणी घाणेरड्या कमेंट करत आहेत त्यांचा बुरखा फाडत आहेत.

# भारताचा यू-18 पुरुष हॉकी संघ जाहीर

## आशिया चषक स्पर्धा जपानमधील काकामिगहारा येथे होणार

**महाईन्यूज । भोपाळ**

**आशिया चषक स्पर्धा 29 मे ते 6 जून या कालावधीत जपानमधील काकामिगहारा येथे होणार असून, या स्पर्धेसाठी भारतीय संघाचे नेतृत्व केतन कुशवाहाकडे सोपविण्यात आले आहे. सरदार सिंग आणि रजनीश मिश्रा यांचा समावेश असलेल्या संघाच्या प्रशिक्षक वर्गाच्या मार्गदर्शनाखाली भोपाळ येथील उद्धव दास मेहता सेंट्रल येथे आयोजित कठोर राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरानंतर या संघाची निवड करण्यात आली.**



संघाच्या तयारीचा भाग म्हणून एक्सपोजर टूर अंतर्गत भोपाळ येथे ऑस्ट्रेलियाच्या यू-18 संघाविरुद्ध चार सामन्यांची एक महत्त्वपूर्ण मालिका खेळण्यात आली. स्पर्धेसाठी निवडलेल्या अंतिम संघावर भाष्य करताना प्रशिक्षक सरदार म्हणाले, निवड प्रक्रिया अत्यंत स्पर्धात्मक होती.

तरीही आम्ही 18 खेळाडूंचा असा संघ निवडला आहे, जो आम्हाला परिपूर्ण रणनीतीक समतोल प्रदान करतो. ते पुढे म्हणाले, भोपाळमधील आमचे प्रशिक्षण आणि ऑस्ट्रेलियासारख्या अव्वल दर्जाच्या संघविरुद्ध खेळलेले सराव सामने यामुळे या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील दबाव आणि सामन्याचा वेग याबद्दल उत्तम समज मिळाली आहे. आम्ही गेल्या काही आठवड्यांत आमच्या रणनीतीक शिस्तीवर, पेनल्टी कॉर्नरच्या तंत्रांवर आणि खेळाडूंच्या रचनेवर कसून मेहनत घेतली आहे.




# विनेश फोगट प्रकरणी दिल्ली हायकोर्टाची भारतीय कुस्ती महासंघाला फटकारणी!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रसिद्ध कुस्तीपटू विनेश फोगटला अपात्र ठरवण्याच्या निर्णयावरून दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी भारतीय कुस्ती महासंघाची (डब्ल्यूएफआय) कानउघाडणी केली. तसेच, विनेशच्या क्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी एका तज्ज्ञ समितीची स्थापना करण्याचे निर्देश केंद्र सरकारला दिले.**




उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, नामांकित खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी देण्याचा आपल्या पूर्वीच्या प्रथेपासून डब्ल्यूएफआयने घेतलेली फारकत अनेक गोष्टी सूचित करते. तसेच, प्रसूती रजेनंतर पुन्हा मैदानात परतण्यास उत्सुक असलेल्या विनेश फोगटला आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी मिळेल, याची खात्री करण्याचे निर्देश खंडपीठाने केंद्राला दिले. न्यायालयाने म्हटले की, प्रसिद्ध खेळाडूंना यापूर्वी अशा सवलती दिल्या गेल्या आहेत, मग आता विनेशला वेगळी वागणूक का दिली जात आहे?

मातृत्व ही आपल्या देशात गौरवण्यासारखी बाब मानली जाते, यावर खंडपीठाने भर दिला. त्यामुळे महासंघाने कोणत्याही प्रकारच्या सूडाच्या भावनेने वागू नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

मुख्य न्यायाधीशांचे खंडपीठ विनेश फोगटच्या १८ मे रोजीच्या एका न्यायाधीशांच्या आदेशाविरुद्धच्या अपीलावर सुनावणी करत होते. या आदेशान्वये, भारतीय कुस्ती महासंघाने 'अपात्र' घोषित केलेले असताना, या वर्षीच्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी ३०-३१ मे रोजी नियोजित असलेल्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याबाबत तिला तातडीचा दिलासा नाकारण्यात आला होता. या अगोदर कुस्ती महासंघाने डोपिंगविरोधी नियमांचा हवाला देत फोगाटला २६ जून २०२६ पर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी अपात्र ठरवले होते.

न्यायालयाच्या निरीक्षणामुळे भारतीय कुस्ती महासंघाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सुनावणीदरम्यान खेळाडूंच्या हक्कांवरही भर देण्यात आला. डोपिंगविरोधी नियमांचा हवाला देत महासंघाने तिला जून २०२६ पर्यंत अपात्र ठरवले होते. या निर्णयामुळे महिला खेळाडू आणि मातृत्वानंतर पुनरागमन करणाऱ्या क्रीडापटूंना मोठा दिलासा मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणामुळे महिला खेळाडूंना मातृत्वानंतरही समान संधी मिळणे आवश्यक असल्याचा मुद्दा पुन्हा अधोरेखित झाला आहे. न्यायालयाच्या भूमिकेमुळे क्रीडा महासंघांनी नियमांची अंमलबजावणी करताना संवेदनशीलता आणि पारदर्शकता राखावी, असा स्पष्ट संदेश दिला गेला आहे.

### भारतीय कुस्ती महासंघाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी

दिल्ली उच्च न्यायालयाने भारतीय कुस्ती महासंघाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत विनेश फोगटला निवड चाचण्यांपासून दूर ठेवणे अन्यायकारक असल्याचे नमूद केले. नामांकित खेळाडूंना यापूर्वी विशेष सवलती देण्यात आल्या असल्याची आठवण खंडपीठाने करून दिली. मातृत्वानंतर पुनरागमन करणाऱ्या महिला खेळाडूंना प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करत महासंघाने कोणत्याही सूडबुद्धीने निर्णय घेऊ नयेत, असा इशाराही न्यायालयाने दिला. आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचण्यांत विनेशला संधी देण्याचे निर्देश केंद्र सरकारला देण्यात आले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।

दि. 23 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडमध्ये केमिस्ट संघटनेचा देशव्यापी बंद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने पुकारलेल्या देशव्यापी बंदला पिंपरी-चिंचवड शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. पिंपरी चिंचवड परिसरातील सर्व होलसेलर तसेच रिटेल औषध विक्रेते या संपात सहभागी झाले होते.**

औषध व्यवसायाशी संबंधित गंभीर प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा संप पुकारण्यात आला होता. यामुळे शहरातील जवळपास अडीच हजार औषध दुकाने बंद होती.

बेकायदेशीर व अनियंत्रित ऑनलाइन औषध विक्री तात्काळ बंद करण्यात यावी, ई-फार्मसी व ऑनलाइन कंपन्यांकडून डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय नियमबाह्य पद्धतीने औषध विक्री होत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स ॲक्टचे काटेकोर पालन करण्यात यावे, औषध विक्री क्षेत्रातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, औषध विक्रेत्यांवरील अन्यायकारक धोरणे मागे घेऊन लघू व मध्यम केमिस्ट व्यवसायांचे संरक्षण करण्यात यावे, रुग्णांना योग्य मार्गदर्शन, सुरक्षित औषध वितरण व प्रशिक्षित फार्मासिस्टची सेवा उपलब्ध राहावी, यासाठी पारंपरिक औषध विक्री व्यवस्था मजबूत करण्यात यावी आदी मागण्या या वेळी संघटनांच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

> ऑनलाइन औषध विक्रीमुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असून, स्थानिक फार्मासिस्ट आणि जनऔषध सेवा धोक्यात आली आहे. औषध हे केवळ उत्पादन नसून, तज्ज्ञ फार्मासिस्टच्या मार्गदर्शनाखाली दिली जाणारी आरोग्यसेवा आहे.
> - विवेक तापकीर, उपाध्यक्ष, केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट.

महापौर रवी लांडगे यांनी ऑनलाइन औषध विक्रीस विरोध केला आहे. तसेच, देशव्यापी संपाला पाठिंबा देत फार्मासिस्ट व औषध विक्रेत्यांच्या मागण्यांना त्यांनी समर्थन दर्शविले आहे.

माझ्या थायरॉईडच्या गोळ्या संपल्या होत्या. मी ते घेण्यासाठी नेहमीच्या औषध दुकानात आल्यानंतर समजले की आज संप असल्यामुळे दुकान बंद आहेत. थायरॉईडची गोळी एक दिवसही चुकवायची नसते. आता ज्या रुग्णालयाचे 24 तास मेडिकल सुरू असते, तिथं जावून बघणार आहे, असे तेथील स्थानिक मीनाक्षी जाधव यांनी सांगितले.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*




**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# बिष्णोई गँगचे जेलमधून 'एक्स्टॉर्शन नेटवर्क'

## चंदिगढमध्ये ट्रेनिंग, परिसराची रेकी अन् पुनावळेत फायरिंग; सिग्नल ॲपवर अडीच लाखांची सुपारी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुनावळे येथील ए. जे. फर्निचर मॉलवर झालेल्या गोळीबार प्रकरणात आता थरारक आणि धक्कादायक माहिती समोर येत आहे. फर्निचर व्यावसायिकाकडून दोन कोटी रुपयांची खंडणी उकळण्यासाठी लॉरेन्स बिष्णोई गँगने अक्षरशः कॉर्पोरेट स्टाईल क्राइम ऑपरेशन उभे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सोशल मीडियावरून शार्पशूटर्सची भरती, सिग्नल ॲपवर गुप्त व्यवहार, चंदिगढमध्ये फायरिंग ट्रेनिंग, पुण्यात येऊन रेकी आणि त्यानंतर थेट गोळीबार असा संपूर्ण कट आखण्यात आला होता.**




विशेष म्हणजे, या संपूर्ण कटाचा सूत्रधार सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणातील आरोपी कुलदीप ऊर्फ कशीष असल्याचे उघड झाले असून, त्याने जेलमधूनच आरोपींना हँडल केल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

या प्रकरणात आत्तापर्यंत परवीन रामनिवास (वय 22), पंकज कुलदीप (वय 21) आणि सागर अजयपाल (21, सर्व रा. सोनीपत, हरियाणा) या तिघांना गुन्हे शाखेच्या गुंडाविरोधी पथकाने उत्तराखंडमधील हरिद्वार येथून अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना 28 मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यात आरजू बिश्नोई, शुभम लोणकर आणि कुलदीप ऊर्फ कशीष याला अद्याप अटक करण्यात आली नाही.

सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणातील आरोपी कशीष याने आरोपी परवीन रामनिवास याच्याशी सर्वप्रथम इंस्टाग्रामच्या माध्यमातून संपर्क साधला. बिष्णोई गँगसाठी काम करणार का?, असा प्रस्ताव कशीष याने दिला होता. सर्व आरोपी तयार झाल्यानंतर त्यांना सिग्नल ॲप डाउनलोड करण्यास सांगण्यात आले. पुढील सर्व संवाद या एनक्रिप्टेड ॲपवरूनच झाला. याच माध्यमातून फर्निचर व्यावसायिकावर गोळीबार करण्यासाठी अडीच लाख रुपयांची सुपारी निश्चित करण्यात आली. 15 मे रोजी रात्री नऊच्या सुमारास जगदीश भेराराम बिष्णोई हे पुनावळे येथील फर्निचर मॉलसमोर बसले असताना दुचाकीवरून आलेल्या आरोपींनी जवळून पाच ते सहा राऊंड गोळीबार केला. सुदैवाने ते या हल्ल्यातून बचावले. या घटनेनंतर शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

तपासात आणखी एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. गोळीबार करण्यापूर्वी व्यावसायिक जगदीश बिष्णोई आणि त्यांचे भागीदार अशोक कुमार बिष्णोई यांना परदेशी क्रमांकावरून व्हॉट्सॲप कॉल करण्यात आले होते.

### बिष्णोई गँगचे 'एक्स्टॉर्शन मॉड्यूल' सक्रिय

या प्रकरणात शुभम लोणकर याचाही सहभाग समोर येत असून, महाराष्ट्रात बिष्णोई गँगचे एक्स्टॉर्शन मॉड्यूल सक्रिय असल्याचा संशय पोलिसांना आहे. पुण्यातील गोल्डमॅन सनी वाघचौरे, दिघीतील व्यापारी तसेच संत तुकारामनगर परिसरातील खंडणी प्रकरणांशी या आरोपींचा संबंध आहे का, याचीही तपास सुरू आहे. पोलिस आता आरोपींच्या बँक व्यवहारांचा, सोशल मीडिया नेटवर्कचा आणि जेलमधून झालेले संपर्क याचा तपास सुरू आहे. रावेत गोळीबारानंतर पुण्यातील काही व्यापाऱ्यांना पूर्वी मिळालेल्या धमक्या पुन्हा चर्चेत आल्या आहेत.

# जिजामाता रुग्णालयात वैद्यकीय सुविधांची कमतरता; सोनोग्राफी मशीन, लिफ्ट नादुरुस्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरीतील जिजामाता रुग्णालयात दररोज 500 ते 600 बाह्यरुग्ण उपचारासाठी येत असतात; पण येथे विविध वैद्यकीय सुविधांची कमतरता पाहण्यास मिळत आहे. वारंवार लिफ्ट बंद पडणे, बसण्यासाठी अपुरी व्यवस्था, स्वच्छतागृहांची दुरवस्था यामुळे रुग्णांची हेळसांड होत आहे.**



जिजामाता रुग्णालयात 130 बेडची व्यवस्था आहे. याठिकाणी 400 कर्मचारी, 45 डॉक्टर्स आणि 96 परिचारिका आहेत. याठिकाणी जनरल, मेडिसिन आणि प्रसूतीकक्ष, बालरोग विभाग, 8 नवजात शिशु अतिदक्षता विभाग, डायलिसीस व अतिदक्षता विभाग 10 बेड, लसीकरण आदी सुविधा आहेत.

रुग्णालयात बसण्यासाठी अपुरी व्यवस्था आहे. एकाच मजल्यावर सर्व ओपीडी असल्यामुळे रुग्णांच्या रांगा असतात. केस पेपर काढण्यासाठी मोठी रांग होती. तसेच, औषधे घेण्यासाठीही गर्दी दिसून येते. पिंपरी, काळेवाडी, जुन्नर, खेड, मावळ याठिकाणातील रुग्ण तपासणीस येत असतात. रुग्णालयाच्या ओपडीची जागा देखील अपुरी आहे. येथे बसण्यासाठी पुरेशी जात नसल्याने गर्दीच्या वेळी रुग्ण आणि नातेवाईकांचे हाल होतात.

रुग्णालयात न्यूरोलॉजिस्ट आणि नेफ्रोलॉजिस्ट नाहीत. पूर्ण वेळ कार्डियालॉजिस्ट नाहीत. फक्त एका तासासाठी येतात. त्यात जेवढे रुग्ण होतील तेवढ्यांची तपासणी केली जाते.

रुग्णालयातील काही स्वच्छता गृहे बंद आहेत. त्यामुळे तपासणीसाठी आलेल्या महिला, पुरूष यांची गैरसोय होते. बाह्यरुग्ण विभागात तपासणी व उपचारासाठी आलेल्या महिलांना प्रसूती कक्षातील स्वच्छतागृहात जावे लागते. तर, सुरू असलेल्या स्वच्छतागृहामध्ये वॉश बेसीन तुंबलेली आहेत. रुग्णसंख्या दिवसेंदिवस वाढत असताना जिजामाता रुग्णालयातील पायाभूत सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता ही गंभीर समस्या बनत चालली आहे.

### सोनोग्राफीसाठी जुने मशीन, लिफ्ट सतत नादुरुस्त

नवीन रुग्णालय सुरू होऊन 5 ते 6 वर्षे होत आले तरी रुग्णालयात सोनोग्राफीसाठी जुनेच मशीन आहे. दिवसाला याठिकाणी 25 ते 30 सोनोग्राफी करण्यात येतात. गरोदर महिलांना ॲनामली स्कॅन करण्याची गरज भासते ती सुविधा रुग्णायात नाही. त्यासाठी वायसीएम किंवा थेरगाव रुग्णालयात जावे लागते. रुग्णालयातील लिफ्ट सतत नादुरुस्त असतात. एक लिफ्ट डॉक्टर्स आणि कर्मचारी यांच्यासाठी तर, दुसरी रुग्णांच्या नोवाईकांसाठी आहे. अशावेळी एकाच लिफ्टवर भर येतो. तातडीच्यावेळी एखाद्या गंभीर रुग्णाला नेण्याची वेळ आली तर धावपळ होते. आयसीयूसारख्या ठिकाणी असलेली लिफ्टदेखील बंद असलेली दिसून आली आहे. तसेच, लिफ्टमध्ये लिफ्टमनदेखील नसतो.

> रुग्णालयातील लिफ्ट वारंवार बंद पडते. एकच लिफ्ट सुरू असल्याने तातडीच्या वेळी फक्त रुग्ण आणि कर्मचारी यांनाच सुरू असलेल्या लिफ्टने जाण्यास प्राधान्य असते. आम्हाला लिफ्ट येईपर्यंत थांबावे लागते. तसेच, बसण्यासाठी जागा अपुरी असल्याने ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिलांची गैरसोय होते. ओपीडीच्या ठिकाणचे स्वच्छतागृह नादुरुस्त असल्याने त्याला कुलूप असते. तपासणीसाठी वेळ लागला तर गरजेच्या वेळी प्रसूतीगृहातील स्वच्छतागृहात जावे लागते.
>
> - सविता भिंगारदिवे, स्थानिक नागरिक.

# ‘एलपीजी’ विरहित पिंपरी-चिंचवडचा संकल्प!

## गृहनिर्माण सोसायट्या, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड तसेच नागरिकांनी संयुक्तपणे पुढाकार घेण्याचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि आधुनिक इंधन व्यवस्थेकडे नेण्याचा निर्धार महापालिकेने केला आहे. शहरातील प्रत्येक गृहनिर्माण सोसायटीमध्ये पाईप नैसर्गिक गॅसचा (पीएनजी) वापर वाढविण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबविण्याचे नियोजन आहे. भविष्यात पिंपरी-चिंचवडला देशातील पहिले ‘एलपीजी विरहित शहर’ बनविण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्या, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड तसेच नागरिकांनी संयुक्तपणे पुढाकार घेण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.**




घरगुती पाईप गॅसचा वापर वाढविणे, एलपीजी गॅसवरील अवलंबित्व कमी करणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षित आणि पर्यावरणपूरक इंधनाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल), गृहनिर्माण सोसायट्यांचे प्रतिनिधी तसेच सहकार विभागाचे उपनिबंधक यांच्याबरोबर महापालिका प्रशासनाने संयुक्त बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपनिबंधक कार्यालयाचे सहायक सहकार अधिकारी शशिकांत श्रृंगारे, बाळासाहेब घुगे, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शंकर कुमार, गृहनिर्माण सोसायट्यांचे सुहास पटवर्धन, सचिन लोंढे, संजीवन सांगळे या वेळी उपस्थित होते.

एलपीजी गॅस सिलिंडरचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करून घरगुती पाईप गॅसचा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. नैसर्गिक वायू हा सुरक्षित, सातत्याने उपलब्ध होणारा आणि आधुनिक शहरी जीवनशैलीस पूरक पर्याय आहे. पाईप गॅस प्रणालीमुळे सिलिंडर साठवणुकीची गरज राहत नाही. गॅस पुरवठा अखंडित राहतो, वेळेची बचत होते तसेच पर्यावरणीय दृष्टीनेही हा पर्याय अधिक परिणामकारक आहे. शहराच्या शाश्वत आणि स्मार्ट विकासाच्या दृष्टीने पाईप गॅसचा वापर वाढविणे हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचा विश्वास आयुक्त सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. ज्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये ‘एमएनजीएल’ची गॅस जोडणी असूनही नागरिकांकडून प्रत्यक्ष वापर केला जात नाही. अशा सोसायट्यांना प्राधान्याने लक्ष करून विशेष मोहीम राबविण्यात येईल. हा गॅस वापरण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.

### जनजागृती मोहीम

नागरिकांमध्ये पाईप गॅसबाबत विश्वास आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. समाजमाध्यमे, माहिती पत्रकांचे वितरण, प्रशिक्षण शिबिरे, प्रत्यक्ष सोसायटी भेटी तसेच घरोघरी जाऊन जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांच्या शंका, तांत्रिक अडचणी आणि पाईप गॅस जोडणीबाबतच्या प्रक्रियेची माहिती देण्यासाठी एमएनजीएलच्या वतीने समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणार आहे.

# म्हाडाचे घर मिळवून देतो म्हणत दाम्पत्याला गंडा; पिंपरीत ७४ लाखांची फसवणूक

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**म्हाडाचे रो-हाउस खरेदी करून देतो असे सांगून एका दाम्पत्याचा विश्वास संपादन करत त्यांची तब्बल ७४ लाख २० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही घटना मार्च २०२४ ते मे २०२६ या कालावधीत संत तुकारामनगर, पिंपरी येथे घडली**




या प्रकरणात ४४ वर्षीय महिलेने संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपापसात संगनमत करून संत तुकारामनगर येथील म्हाडाचे रो-हाउस खरेदी करून देतो असे फिर्यादी व त्यांच्या पतीला सांगितले. आरोपींनी त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून वेळोवेळी रोख आणि ऑनलाईन स्वरूपात एकूण ७४ लाख २० हजार रुपये घेतले आणि घर न देता फसवणूक केली. संत तुकारामनगर पोलीस तपास करत आहेत.

या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांनी मालमत्ता खरेदी करताना अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली आहे. आरोपींनी म्हाडाच्या घराचे आमिष दाखवत फिर्यादी दाम्पत्याची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. व्यवहारासंदर्भातील कागदपत्रे आणि आर्थिक देवाणघेवाणीची माहिती पोलिसांकडून तपासली जात आहे. संबंधित आरोपींनी आणखी कोणाची फसवणूक केली आहे का, याचाही पोलीस शोध घेत आहेत. संत तुकारामनगर पोलीसांनी नागरिकांना कोणताही व्यवहार करण्यापूर्वी कागदपत्रांची खातरजमा करण्याचे आवाहन केले आहे.

# भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

भरधाव वेगातील एका ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (२० मे) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास स्पाईन रोड, एमआयडीसी भोसरी येथे घडली.

उत्तम रणपिसे असे मृत्यू झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. या प्रकरणी ३५ वर्षीय व्यक्तीने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक रहदारीच्या नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून निष्काळजीपणाने चालवला. त्याने उत्तम रणपिसे यांच्या दुचाकीला उजव्या बाजूने जोरात धडक दिली. या धडकेमुळे उत्तम रणपिसे हे दुचाकीसह रस्त्यावर पडले आणि ट्रकचे डाव्या बाजूचे मागील चाक त्यांच्या डोक्यावरून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करत आहेत.



**PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE**
MOSHI

# 43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.



## ADMISSIONS OPEN 2026-27

Nursery to Grade 5

## WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in